दैनिक

MAHILA SANVAD

# महिला संवाद

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

महिला संवाद

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

PUNE : Volume No. 1, Issue No. 268, Marathi Daily Monday, Date - 27 April 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २८८ वा | मराठी दैनिक | सोमवार दि. २७ एप्रिल २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

# संपूर्ण महाराष्ट्र होरपळला; उष्माघाताने मृत्यूंची नोंद

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात उष्णतेचा कडाका चांगलाच वाढल्याचं पहायला मिळत आहे. राज्यात उष्णतेची लाट आली आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. सध्या राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसच्या पार पोहोचला आहे. याचा मोठा परिणाम दैनंदीन कामकाजावर होताना दिसत असून, रस्ते आणि बाजारपेठेत शुकशुकाट पहायला मिळत आहे. परभणीमधून मोठी बातमी समोर येत आहे, ती म्हणजे परभणीत उष्मघातामुळे पहिला बळी गेला आहे. नाशिक येथून परभणीत भावाकडे आलेल्या ३७ वर्षीय व्यक्तीचा उष्माघातामुळे मृत्यू झाला आहे. परभणीच्या नांदखेड रोड भागात ही घटना घलडी आहे. शिवाजी बबन कांबळे वय ३७ असं मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. या घटनेनंतर शिवाजी कांबळे यांच्या भावाच्या फिर्यादीवरू नानलपेठ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

अकोला जिल्ह्यात पुन्हा एकदा उष्णतेची तीव्र लाट पहायला मिळत आहे. आज अकोला जिल्ह्यामध्ये ४४ अंश सेल्सिअस एवढ्या तापमानाची नोंद झाली आहे. शनिवारी अकोल्यातील तापमानाने ४५.६ अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला होता. त्यामुळे देशातील सर्वाधिक तापमानाचा विक्रेम नोंदवला गेला. आजही त्याच धर्तीवर उष्णतेचा कडाका कायम असून पुढील तीन ते चार दिवस अशीच परिस्थिती राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

या कडक उन्हातही वाहतूक पोलीस कर्तव्य बजावताना दिसत असून त्यांचे विशेष कौतुक केले जात आहे. दरम्यान, नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय दुपारी १२ ते ४ या वेळेत बाहेर पडू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. बाहेर पडताना डोक्यावर टोपी, रुमाल किंवा गॉगल वापरणे, तसेच पाण्याची बाटली सोबत ठेवणे आवश्यक असल्याचेही प्रशासनाने सांगितले आहे. दरम्यान अकोल्याचे तापमान ४४ अंश सेल्सिअसवर पोहोचल्याने खबरदारीचा उपाय म्हणून अनेक ठिकाणी शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

नाशिक जिल्ह्यातील थंड हवामानासाठी ओळखल्या जाणाऱ्या निफाड तालुक्यात यंदा उन्हाचा कडाका चांगलाच वाढला आहे. लासलगाव येथे गेल्या १३ एप्रिलपासून कमाल तापमान सतत ४० अंश सेल्सिअसच्या वर असून आज तापमानाने ४२.६ अंश सेल्सिअसचा उच्चांक गाठला आहे. या तीव्र उष्णतेचा फटका पोल्ट्री व्यवसायाला बसत आहे. वाढत्या तापमानामुळे कोंबड्यांच्या शरीरातील प्रतिकारशक्ती (इम्युनिटी) कमी होत असून त्याचा थेट परिणाम त्यांच्या आरोग्यावर होत आहे. उष्णतेमुळे कोंबड्यांचे अन्न व पाणी घेण्याचे प्रमाण घटले असून त्यामुळे त्यांची वाढ मंदावत आहे. याशिवाय, उष्माघातामुळे कोंबड्यांच्या मृत्यूचे प्रमाणही वाढल्याने पोल्ट्री व्यावसायिक चिंतेत आहेत.

दुसरीकडे नाशिक जिल्ह्यातील मालेगावमध्ये देखील उन्हाचा कडाका वाढला आहे. मालेगावात उष्णतेची तीव्रता वाढली असून आज ४३.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. मालेगावमध्ये सध्या एवढी प्रचंड उष्णता आहे की, तापमानाने मागचे सर्वच रेकॉर्ड मोडले आहेत. कडक उन्हामुळे नागरिक हैराण झाले असून, दुपारच्या सुमारास रस्त्यांवर शुकशुकाट पहायला मिळत आहे. उष्णतेच्या लाटेमुळे मानवी आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता असून, नागरिकांनी उन्हापासून संरक्षणासाठी आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. पुढील काही दिवस उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे.

दरम्यान मुंबई आणि ठाण्यात देखील तापमानाचा पारा चांगलाच वाढला आहे. मुंबई आणि ठाण्यात ३९ अंस सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. मुंबईला आज उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. शहराच्या पूर्व उपनगरांमध्ये तापमान ३९ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे तर शेजारील ठाण्यातही ३९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. मात्र पुढील आठवड्यात तापमानात काहीशी घट




होण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे.

विदर्भातील तीन शहरांचा पारा ४५ अंश सेल्सिअसच्या पार पोहोचला आहे, तर तीन शहरांचं तापमान ४४ अंश सेल्सिअस एवढं नोंदवण्यात आलं आहे. अनेक जिल्ह्यांमधील तापमान ४२ अंश सेल्सिअसच्या पार पोहोचलं आहे. संपूर्ण विदर्भ उन्हात होरपळत आहे , नागरिक उन्हाने हैरण झाले असून, रस्त्यावर शुकशुकाट पहायला मिळत आहे. दरम्यान तापमानात आणखी वाढ होणार असल्याचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. नागपुरात तापमान ४४.२ अंश सेल्सियस तर अकोला , अमरावती आणि वर्धा जिल्ह्यातील तापमान ४५ अंश सेल्सियसवर पोहोचलं आहे. तापमानात वाढ झाल्याने दुपारच्या वेळी कामा शिवाय बाहेर पडू नये , पाणी सोबत ठेवावं, अशा सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत.

अकोला - ४५.६ अंश सेल्सिअस, अमरावती - ४५.६ अंश सेल्सिअस, भंडारा - ४४.० अंश सेल्सिअस, बुलढाणा - ४२.२ अंश सेल्सिअस, चंद्रपूर - ४४.२ अंश सेल्सिअस, गडचिरोली - ४३.६ अंश सेल्सिअस, गोंदिया - ४३.६ अंश सेल्सिअस, नागपूर - ४४.२ अंश सेल्सिअस, वर्धा - ४५.५ अंश सेल्सिअस, वाशीम - ४३.० अंश सेल्सिअस आणि यवतमाळ- ४३.० अंश सेल्सिअस एवढ्या तापमानाची नोंद झाली आहे.

शहरात कालपासून पुन्हा एकदा तापमानात वाढ झाल्याचं दिसून येत आहे. पुण्याचं तापमान ४०.९ अंशावर पोहोचले आहे. लोहगाव परिसरात ४२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. रात्रीच्या तापमानातील सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ नोंदवण्यात आली आहे.

अमरावतीमध्ये राज्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद झाली आहे. काल अमरावतीचे तापमान ४५.६ अंश सेल्सिअस एवढं नोंदवण्यात आल्याने हा या वर्षीचा सर्वाधिक उष्ण दिवस ठरला आहे. उष्णतेच्या लाटेत अमरावती जिल्हा होरपाळून निघत आहे. चिंतेची बाब म्हणजे आणखी पुढील दोन दिवस हवामान विभागाकडून शहरात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान या सर्व पार्श्वभूमीवर दुपारी ११ ते तीन वाजेपर्यंत आवश्यक काम असेल तरच घराबाहेर पडा अन्यथा घराबाहेर पडू नका, घराबाहेर पडताना आवश्यक खबरदारी घ्या, व उष्मघाताचे संकेत जाणवल्यास तात्काळ आरोग्य विभागाकडून उपचार करून घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

नंदरबार जिल्हा देखील चांगलाच तापला आहे. जिल्ह्यात ४१ अंश सेल्सिअस एवढ्या तापमानाची नोंद झाली आहे. कमी आर्द्रतेमुळे उकाड्याची तीव्रता वाढली असून, त्याचा मोठा त्रास नागरिकांना होत आहे. दुपारच्या वेळी रस्त्यांवर शुकशुकाट पहायला मिळत आहे. पुढील महिन्यात जिल्ह्यात तापमान आणखी वाढण्याची शक्यता असल्याचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.

लातूर जिल्ह्यातल्या गोंद्री इथं उष्माघाताने नऊ महिन्याच्या बाळाचा मृत्यू झाला आहे. उष्माघाताने मृत्यू झाल्याची ही जिल्ह्यातली दुसरी घटना आहे. शिया गोरे असं गोंद्री गावात उष्माघाताने मृत्यू पावलेल्या बाळाचे नाव आहे. यापूर्वी औराद शहाजनी इथंही उष्माघाताने वृद्ध शेतकरी लक्ष्मण भंडारे यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. कडाक्याचे ऊन आणि उष्ण हवामान याचा थेट परिणाम शरीरावर होतो आहे.

## थोडक्यात...

### एक्सप्रेस हायवेवरील घाटाला मिळणार बायपास; ‘मिसिंग लिंक’ प्रकल्पाचे १ मेला उद्घाटन

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला पूर्णतः ‘ऍक्सेस कंट्रोल’ बनवणाऱ्या महत्त्वाच्या ‘मिसिंग लिंक’ प्रकल्पाचे ९९ टक्के काम पूर्ण झाले असून, १ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होऊन प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सिग्नल-फ्री होणार असल्याने अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आज प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन मिसिंग लिंक प्रकल्पाची पाहणी केली. मी स्वतः येथे येऊन कामाची गुणवत्ता तपासली असून काम समाधानकारक झाले आहे. उर्वरित किरकोळ कामे पुढील काही दिवसांत पूर्ण होतील. वेळेत आणि उच्च दर्जाने काम पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत, असे त्यांनी सांगितले. सुमारे १०.५ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पात दोन भव्य बोगदे, उंच व्हायाडक्ट आणि टायगर व्हॅलीवरील सुमारे १८२ मीटर उंच केबल-स्टेड पूल उभारण्यात आला आहे. सुमारे २३.७५ मीटर रुंद बोगदा हा जगातील सर्वात रुंद बोगद्यांपैकी एक मानला जातो. ७० किमी प्रतितास वेगाने वाहणारे वारे, मुसळधार पाऊस आणि कठीण भौगोलिक परिस्थितीत हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला आहे. लोणावळा तलावाच्या १८२ मीटर खालून हा रस्ता जाणार आहे, हा प्रकल्प पूर्ण करणे म्हणजे एक आव्हान होते मात्र महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हे मोठे आव्हान स्वीकारून प्रकल्प पूर्णत्वास नेल्याचे शिंदे यांनी नमूद केले. मिसिंग लिंक सुरू झाल्यानंतर घाटातील धोकादायक वळणे आणि वाहतूक पूर्णपणे बायपास होणार असून प्रवासाचा वेळ सुमारे २० ते ३० मिनिटांनी कमी होईल. या प्रकल्पामुळे घाटातील अपघात जवळपास शून्यावर येतील, असा ठाम दावा शिंदे यांनी केला. यामुळे इंधनाची बचत, वेळेची बचत आणि प्रदूषणात लक्षणीय घट होणार आहे. या प्रकल्पामुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचे अंतर सुमारे ६ किलोमीटरने कमी होणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात बस आणि हलक्या वाहनांना प्राधान्य देण्यात येणार असून त्यामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल. टोलवाढीबाबत स्पष्ट करताना शिंदे म्हणाले की, मिसिंग लिंक प्रकल्पामुळे टोलमध्ये कोणतीही वाढ होणार नाही. खालापूर टोल नाक्यावरही सध्या कोणतीही वाढ प्रस्तावित नाही. सुमारे ६७०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पाला २०१९ साली मंजुरी देण्यात आली होती. त्या वेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते, तर आता त्यांच्या उपस्थितीतच या प्रकल्पाचे लोकार्पण होणार असल्याने हा एक विशेष योगायोग असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच या प्रकल्पामुळे लोहगड, विसापूर किल्ले आणि कार्ला लेणी यांसारख्या पर्यटन स्थळांना अधिक चांगली कनेक्टिव्हिटी मिळणार असून पर्यटनालाही चालना मिळेल. यासाठीच या प्रकल्पातील बोगद्यांना देखील गडकिल्ले आणि कार्ला लेण्याच्या प्रतीकृतीप्रमाणे सजवण्यात आले.

# मराठी शिकलीच पाहिजे; छगन भुजबळ यांचे स्पष्ट मत

**नाशिक । प्रतिनिधी**



टॅक्सी आणि रिक्षाचालकांसाठी मराठी भाषा सक्तीची करण्यात आली आहे. जे रिक्षाचालक मराठी बोलू शकणार नाहीत, त्यांचे वाहन परवाने एक मे नंतर थेट रद्द करण्यात येणार आहेत. सरकारच्या या निर्णयामुळे सध्या वातावरण चांगलंच तापलं आहे. टॅक्सी आणि रिक्षाचालकांकडून या विरोधात आंदोलनाचा इशारा देखील देण्यात आला आहे. तसेच सरकारमध्ये देखील या निर्णयावरून दोन मतप्रवाह असल्याचं दिसून येत आहे. काही नेत्यांकडून सरकारच्या या निर्णयाचं स्वागत करण्यात आलं आहे, तर काही जाणांकडून सरकारच्या या निर्णयाचा विरोध करण्यात आला आहे. दरम्यान यावर आता मंत्री छगन भुजबळ यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. भुजबळ यांनी मोठं विधान केलं आहे.

प्रचंड प्रमाणात हा वर्ग आहे. जो महाराष्ट्रातला नाही. दुर्दैवाने टॅक्सी रिक्षा चालवणारे अजूनपर्यंत मराठी शिकलेले नाहीत. या लोकांना आता मराठी शिकवावी लागेल. काहीतरी एक योजना आखतील ते. पीडब्ल्यूडी नुसतं सांगतंय यांचे पण एकेक दोन दोन दिवसाचे कोर्स घेतले पाहिजेत. अनेक नियम आहेत, पण ते कोणी पाळत नाहीत. आवश्यक मराठी त्यांनी शिकलं पाहिजे. आपले मराठी लोक ज्या वेळेला गुजरातमध्ये जातात गुजराती बोलतात. तामिळनाडूमध्ये गेले तर तामिळी बोलतात. येथे सुद्धा कामापुरते त्या लोकांनी मराठीत बोललं पाहिजे. त्यासाठी मुख्यमंत्री सांगतात ते बरोबर आहे.

वाद करून काही मुद्दा मिटणार नाही, असं भुजबळ यांनी म्हटलं आहे. दरम्यान शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली अशी चर्चा सुरू आहे. यावर देखील भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

# पोलिस ठाण्यातील माहिती लीक प्रकरण; वादानंतर कर्मचारी गायब

**नागपूर । प्रतिनिधी**

नागपूरच्या सायबर पोलीस स्टेशनमध्ये धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पोलीस स्टेशनमधील माहिती बाहेर कशी गेली, यावरून एका पोलीस कर्मचाऱ्याला अधिकाऱ्यांकडून मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे पोलीस दलातच खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे संबंधित पोलीस कर्मचारी गेल्या २४ तासांपासून बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. प्रफुल्ल ठाकरे असं या कर्मचाऱ्याचे नाव असून त्यांच्या कुटुंबीयांनी याबाबत मोठी चिंता व्यक्त केली आहे.

पोलीस स्टेशनमधील कारवाईची माहिती पत्रकारांपर्यंत कशी पोहोचली, यावरून अधिकाऱ्याने पोलीस कर्मचारी प्रफुल्ल ठाकरे यांची विचारणा केली. याच कारणावरून त्यांच्यासोबत धक्काबुक्की करण्यात आली आणि मोबाईल हिसकावून घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे.



मारहाण आणि अपमान झाल्याची तक्रार घेऊन प्रफुल्ल ठाकरे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे गेले होते. मात्र त्यांना न्याय न मिळाल्याने ते कालपासून बेपत्ता असल्याचं सांगितलं जात आहे. यामुळे या प्रकरणाला अधिक गंभीर वळण मिळालं आहे.

प्रफुल्ल ठाकरे यांच्या कुटुंबीयांनी सायबर पोलीस स्टेशनमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केले आहेत. काही अधिकारी स्वतःच्या चुका झाकण्यासाठी प्रफुल्ल यांना त्रास देत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. आमच्या मुलाचा शोध घ्या, काहीही अनुचित घडलं तर जबाबदार कोण? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. या प्रकरणी आरोप झालेले पोलीस अधिकारी विजय राणे यांनी कॅमेरासमोर बोलण्यास नकार दिला.

त्यांनी प्रफुल्ल ठाकरे यांना पोलीस स्टेशनमधील माहिती पत्रकारांपर्यंत कशी काय गेली याची विचारणा केल्याची कबुली दिली. मात्र या प्रकरणी कोणतीही मारहाण झाली असल्याचा आरोप पोलीस अधिकारी विजय राणे यांनी फेटाळला आहे. या घटनेनंतर पोलीसच पोलीस ठाण्यात सुरक्षित आहेत का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. प्रफुल्ल ठाकरे यांच्या आई-वडिलांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून त्यांच्या मुलाचा शोध घ्यावा, अशी विनंती केली आहे.

# मुंबईत वन्यजीव तस्करीवर मोठी कारवाई

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईच्या मालवणी पोलिसांनी वन्यजीव तस्करांविरुद्ध एक अत्यंत धाडसी आणि मोठी कारवाई केली आहे. या मोहिमेत पोलिसांनी एका आरोपीला अटक केली असून, त्याच्याकडून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तब्बल १ कोटी १५ लाख ७० हजार रुपये किंमत असलेली व्हेल माशाची उलटी जप्त करण्यात आली आहे. या घटनेमुळे मुंबईत मोठी खळबळ उडाली आहे.

मालवणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शासनाने प्रतिबंधित केलेल्या वस्तूची तस्करी करण्यासाठी एक तरुण मालाड पश्चिम परिसरात येणार होता, अशी माहिती आम्हाला मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून अदनान आसिफ खान (२४) याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे १.१५७ किलो ग्रॅम वजनाची व्हेल माशाची उलटी सापडली. आरोपी अदनान हा बोरिवली पूर्व येथील कुलपवाडी, राईटेकडी, शिवशक्ती चाळीत राहणारा आहे. तो एका खासगी कंपनीत नोकरी करतो.

ही व्हेल माशाची उलटी एकूण १.१५७ किलो ग्रॅम वजनाची होती. या व्हेल माशाच्या उलटीचा सौदा १ कोटी १५ लाख ७० हजार इतका ठरला होता. ही उलटी बेकायदेशीर रित्या विकण्याच्या तो तरुण मालाडला आला होता. त्याचवेळी पोलिसांनी त्याला मुद्देमालासह रंगेहाथ अटक केली. यामुळे तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

‘स्पर्म व्हेल’ हा वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ च्या अनुसूची १ मध्ये नमूद असलेला अत्यंत संरक्षित प्राणी आहे. या प्राण्याच्या कोणत्याही अवयवांची किंवा उत्पादनांची विक्री करणे हा गंभीर आणि अजामीनपात्र



गुन्हा आहे. या प्रकरणी मालवणी पोलिसांनी गुन्हा रजिस्टर क्रमांक ७०७/२०२६ नुसार आरोपीवर खालील कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

भारतीय न्याय संहिता (इछड): कलम १३२, ११८ (२), वन्यजीव संरक्षण कायदा १९७२: कलम २, ३९, ४४, ४८ (अ), ४९ (ब), ५७, ५१ या कलमातंर्गत आरोपीवर कारवाई करण्यात आली आहे.

व्हेल माशाची उलटीला शास्त्रीय भाषेत ‘अँबरग्रीस’ म्हटले जाते. हा पदार्थ स्पर्म व्हेल माशाच्या पचनसंस्थेतून बाहेर पडतो. याला समुद्रातील तरंगते सोने असेही म्हटले जाते. याचा उपयोग प्रामुख्याने जगभरातील अत्यंत महागडी सुगंधी द्रव्ये बनवण्यासाठी केला जातो.

सुंगधाला दीर्घकाळ टिकवून ठेवण्याची नैसर्गिक क्षमता या पदार्थात असल्याने काळ्या बाजारात याला सोन्यापेक्षाही जास्त किंमत मिळते. मात्र, वन्यजीव कायद्यानुसार भारतात याची खरेदी-विक्री करणे कायदेशीररीत्या गुन्हा आहे. सध्या मालवणी पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, यामागे एखादी आंतरराष्ट्रीय टोळी सक्रिय आहे का? हा माल कुठून आणला होता, याचा शोध घेत असल्याचे पाहायला मिळत आहे.

## संपादकीय...

### उष्णतेचा कहर; महाराष्ट्र होरपळला

महाराष्ट्रात सध्या उष्णतेची तीव्र लाट सुरू असून राज्यातील बहुतांश भागात तापमान ४० ते ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. हवामान विभागाने हाय अलर्ट जारी केला असून या उष्णतेचा नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर मोठा परिणाम होत आहे. दुपारच्या वेळेत रस्ते, बाजारपेठा आणि सार्वजनिक ठिकाणे जवळपास ओस पडलेली दिसत आहेत. परभणी जिल्ह्यात उष्माघातामुळे ३७ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे उष्णतेच्या वाढत्या तीव्रतेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. अकोला जिल्ह्यात तापमानाने ४५.६ अंश सेल्सिअसचा टप्पा पार केला असून हे देशातील उच्चांकी तापमानांपैकी एक मानले जात आहे. पुढील तीन ते चार दिवस अशीच उष्णता कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. नाशिक जिल्ह्यातील निफाड, लासलगाव आणि मालेगाव या भागांमध्येही तापमान ४२ ते ४३ अंशांपर्यंत गेले आहे. याचा परिणाम शेती आणि विशेषतः पोल्ट्री व्यवसायावर होत आहे. कोंबड्यांची प्रतिकारशक्ती कमी होत असून त्यांचे अन्न-पाणी सेवन घटले आहे, त्यामुळे उत्पादनावर परिणाम होत आहे. काही ठिकाणी कोंबड्यांच्या मृत्यूंचीही नोंद झाली आहे. मुंबई आणि ठाणे या किनारपट्टी भागांमध्येही तापमान ३९ अंशांपर्यंत पोहोचले आहे. शहरात यलो अलर्ट देण्यात आला असून नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विदर्भ हा सर्वाधिक प्रभावित भाग ठरत असून अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये तापमान ४४ ते ४५ अंशांपर्यंत पोहोचले आहे. अमरावतीमध्ये ४५.६ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले असून हे यंदाचा उच्चांक आहे. रस्त्यांवर शुकशुकाट असून नागरिक उकाड्यामुळे हैराण झाले आहेत. पुण्यात तापमान ४०.९ अंश सेल्सिअसपर्यंत गेले असून लोहगाव भागात ४२ अंशांची नोंद झाली आहे. रात्रीच्या तापमानातही वाढ झाल्यामुळे उकाडा अधिक जाणवत आहे.

### बाईचा पाचोळा होऊ नये म्हणून स्वतःला मजबूत करणं गरजेच

बाई म्हणजे केवळ नात्यांची ओळख नाही, तर ती स्वतः मध्ये एक पूर्ण व्यक्तिमत्त्व आहे. पण अनेक वेळा परिस्थिती, समाजाची बंधनं आणि इतरांवर असलेलं अवलंबित्व यामुळे तिचं अस्तित्व हलकं होत जातं - अगदी पाचोळ्यासारखं, जे वाऱ्याच्या दिशेनुसार उडत राहतं. ही अवस्था बदलण्यासाठी बाईने स्वतःला आतून मजबूत करणं अत्यावश्यक आहे. स्वाभिमान, आत्मविश्वास आणि स्वतःच्या निर्णयांवर उभं राहण्याची ताकद - या गोष्टी तिच्या आयुष्याला स्थैर्य देतात. म्हणूनच, बाईचा पाचोळा होऊ नये, यासाठी तिने स्वतःची समज, विचार आणि मनोधैर्य भक्कम करणं ही काळाची गरज आहे... समाज बदलतोय, काळ पुढे सरकतोय, पण अजूनही अनेक ठिकाणी बाई ही व्यक्ती म्हणून नाही तर भूमिका म्हणूनच पाहिली जाते - कुणाची मुलगी, कुणाची बायको, कुणाची आई. या सगळ्या ओळखींपलीकडे तिचं स्वतःचं अस्तित्व आहे, तिची स्वप्नं आहेत, तिचा स्वाभिमान आहे - हे मान्य करण्याची वेळ आता निघून गेली आहे, ती जगण्याची वेळ आली आहे....

पाचोळा म्हणजे वाऱ्याच्या झोतासोबत उडणारी, स्वतः चा ठावठिकाणा नसलेली गोष्ट. बाईचं आयुष्य असं अस्थिर, इतरांच्या निर्णयांवर अवलंबून राहू नये. परिस्थिती काहीही असो - नात्यांमध्ये ताण, आर्थिक अडचणी, समाजाचा दबाव - बाईने स्वतःला इतकं मजबूत केलं पाहिजे की ती कुठल्याही वादळात ठाम उभी राहू शकेल.... स्वतःला मजबूत करणं म्हणजे फक्त कठोर होणं नाही. ते आहे - स्वतःची किंमत ओळखणं, नाही म्हणण्याची ताकद ठेवणं, स्वतःच्या भावना मान्य करणं आणि गरज पडली तर एकटीनेही चालण्याची तयारी ठेवणं...

आज अनेक बायका नात्यांसाठी, समाजासाठी स्वतःला विसरतात. पण जेव्हा त्याच नात्यांमध्ये तिला दुर्लक्षित केलं जातं, तेव्हा तिचं मन तुटतं. म्हणूनच, स्वतःचं अस्तित्व टिकवणं हे सर्वात महत्त्वाचं आहे. कारण जी बाई स्वतःवर उभी राहते, तिच्यावर अन्याय करणं कुणालाही सोपं राहत नाही....

शिक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि मानसिक ताकद - या तीन गोष्टी बाईला पाचोळा होण्यापासून वाचवतात. पैसा कमावणं हेच स्वातंत्र्य नाही, तर निर्णय घेण्याची क्षमता हे खऱ्या स्वातंत्र्याचं लक्षण आहे. आणि ती ताकद बाहेरून कुणी देत नाही, ती आतून तयार करावी लागते....समाज काय म्हणेल यापेक्षा मी काय योग्य आहे हे विचारायला बाईने शिकायला हवं. कारण शेवटी, आयुष्य तिचं आहे - त्याची जबाबदारीही तिचीच आहे... बाईने स्वतःला इतकं सक्षम बनवलं पाहिजे की ती कुणावर अवलंबून न राहता स्वतःचं आयुष्य घडवू शकेल. कारण बाई जर मजबूत असेल, तर तिच्या आयुष्याचा पाया कधीच ढासळणार नाही.... पाचोळा होणं ही नियती नाही - ती कमजोरी आहे. आणि मजबुती हीच बाईची खरी ओळख असायला हवी

**दैनिक महिला संवाद वर्तमानपत्र**
**संपादक - ज्योती आडेकर**

# कशा वाचतील मराठी शाळा ?

अनेक वर्षांच्या संघर्षानंतर अखेर ३ आक्टोंबर २०२४ रोजी मराठी भाषा अभिजात झाली. परंतु पुढे काय? याबाबत सर्वच पातळीवर अनास्था दिसते. अभिजात भाषेचा दर्जा मिळणे ही अभिमानाची गोष्ट आहे. हा मिळालेला दर्जा टिकवण्यासाठी आणि खऱ्या अर्थाने अभिजात होण्यासाठी प्रयत्न करणे आता त्याहून महत्त्वाचे ठरणार आहे.

'माय मराठी मरते इकडे,
परकीचे पद चेपू नका'
भाषा मरता देशही मरतो
संस्कृतिचाही दिवा विझे।

सर्वकालिक कवी श्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या या ओळी आजही आपल्याला आपल्या वास्तवाची आठवण करून देतात. आज मराठी माणूसच मराठी बोलणे कमीपणाचे मानतो. 'मला मराठी तितकीशी चांगली येत नाही' हे अभिमानाने मिरवतो. परिणामतः सध्या मराठी शाळांना घरघर लागली हे नाकारून चालणार नाही. नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून मोफत व सक्तीचे दिले गेले पाहिजे असे म्हटले आहे. या आधीच्याही प्रत्येक शैक्षणिक धोरणात प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून सर्वांना मोफत सक्तीचे देणे बंधनकारक होते पण तसे प्रत्यक्षात घडलेले दिसत नाही. कागदावर लिहिलेले धोरण व प्रत्यक्षात अंमलबजावणी यात आढळून येणारी विसंगती येथे आपल्याला स्पष्ट दिसते. आताही मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळून एक वर्षापेक्षा जास्त काळ लोटला आहे पण प्रशासकीय, सामाजिक व शैक्षणिक पातळीवर त्याच्या उपयोगाबाबतचे चित्र स्पष्ट होत नाही.

विद्यार्थी गुणवत्ता वाढीच्या योजना, आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना, अल्पसंख्यांक प्री. मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना, सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना, सुवर्ण महोत्सवी आदिवासी शिष्यवृत्ती योजना, पूर्व व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती योजना, मुला मुलींसाठी शासकीय वस्तीगृह योजना, शासकीय विद्यानिकेतन योजना, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना, राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा योजना, राजश्री शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना, अनुसूचित विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना, सफाई कामगारांच्या मुलांसाठी योजना, बारावीपर्यंत मोफत शिक्षण, शालेय आरोग्य तपासणी योजना, हंगामी वस्तीगृह योजना, राजीव गांधी अपघात सानुग्रह अनुदान योजना, राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजना, मोफत गणवेश योजना, अहिल्याबाई होळकर मुलींसाठी मोफत बस योजना, उपस्थिती भत्ता योजना, मोफत पाठ्यपुस्तके योजना यासारख्या अनेक योजना कार्यरत असूनही मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांची संख्या कमीच का राहते?

या उलट इंग्रजी माध्यमात या योजना इतक्या प्रमाणात पोहोचतच नाहीत. याशिवाय काही इंग्रजी माध्यमातील शाळांमध्ये प्रशिक्षित शिक्षकांचाही अभाव जाणवतो. माझ्या मते मराठी शाळांची दुरावस्था ही केवळ तेथे सुखसुविधा नाहीत किंवा वर्तमान जग इंग्रजीचे आहे म्हणून झालेली नाही. मराठी माध्यमांच्या शाळेतही उत्तम इंग्रजी शिकवले जाऊ शकते. ३०-३५ वर्षांपूर्वी मराठी शाळांमध्ये एक एक वर्गाच्या अनेक तुकड्या होत्या प्रत्येक वर्गात ६० ते ७० विद्यार्थी असत. त्यावेळी साधारणतः तालुका पातळीवर डीएड-बीएड कॉलेज झाले होते. दहावीला ८०-९०% मिळवणारे अनेक विद्यार्थी मोठ्या प्रमाणात शासकीय डीएडला जात आणि शिक्षक होत. बी.ए., बी. कॉम., बी.एससी. ला सुद्धा ८०-९०% मिळवणारे बहुतेक विद्यार्थी शासकीय बीएड करत. सर्वसाधारण ५० ते ७० % मिळवणारे विद्यार्थी स्थानिक नॉन ग्रँट कॉलेजमध्ये अतिरिक्त फी भरून डीएड-बीएड करत व शिक्षकाचा जॉब सुद्धा काही ठिकाणी संस्थाचालकांना चिरीमिरी देऊन मिळवत. पण त्या पुढील काळात तो मिळवण्यासाठी मोठा संघर्ष सुरू झाला. शिक्षणातील बाजारीकरणाने येथे वेग घेतलेला दिसतो. शिक्षणासंबंधी विविध घटकांमध्ये विविध प्रकारचे अभूतपूर्व परिवर्तन दिसून येते. परिणाम असा झाला की एकेका जागेसाठी २०० ते ४०० प्रशिक्षणप्राप्त शिक्षक अर्ज करत. साधारणता ४० वर्षांपूर्वीचा काळ असा होता की शिक्षकाची नोकरी म्हणजे मानसन्मान आणि सुखाची नोकरी. पण पुढे या व्यवस्थेत काही दोष निर्माण झाले. परिणामी मराठी शाळेतील शिक्षणाकडे दुर्लक्ष होऊ लागले. शिक्षकांच्या हक्कासाठी व अधिकारासाठी आंदोलन करणाऱ्या शिक्षक संघटनाही याच काळात उभारीला आल्या. त्यांचा शिक्षणाच्या विकासासाठी सकारात्मक फायदा म्हणावा तसा झाला नाही. या उलट काही घरांमध्ये तरुण मुलं-मुली, त्यांचे आई-वडील, सासू-सासरे सर्वच शिक्षक म्हणून शिक्षक होण्याचे सुखाचा अनुभव घेत होते. विद्यार्थ्यांची संख्या कमी होण्यास सुरुवात झाली तसे शासनाकडून येणाऱ्या शिक्षणेतर कामांबाबत शिक्षक संघटनांकडून आंदोलने सुरू झाली. यात 'शाळा विद्यार्थ्यांचे काय नुकसान होते' हा विचार मागे पडला. काळ झपाट्याने असा बदलत गेला की एका वर्गाच्या अनेक तुकड्यांऐवजी एकच तुकडी राहिली, त्यातही ओढून ताणून कसेबसे २५-३० विद्यार्थी राहिले. याबद्दल आपण हळहळ व्यक्त करतो, पण आपल्याला त्याची लाज वाटत नाही. या सर्व पार्श्वभूमीवर पुढील काळात विद्यार्थी संख्या इतकी कमी झाली की काही शाळांमध्ये बोटावर मोजता येतील इतकेच विद्यार्थी शिल्लक राहिले. परिणामतः अशा शाळा बंद करण्याखेरीज शासनाकडे पर्याय उरला नाही. आता बंद पडत जाणाऱ्या शाळांविरुद्ध आंदोलने सुरू आहेत. कारण प्रश्न आता वेगळे उभे राहिले. विद्यार्थी संख्या वेगाने कमी झाल्याने होणाऱ्या शिक्षकांच्या बदल्या किंवा अनेकांना पर्यायी शाळा न मिळाल्याने होणारी ससेहोलपट, विद्यार्थी मिळवणे व शासकीय कामाचा रेटा यात शिक्षकांचे सँडविच होतांना दिसत आहे. परिणामी आज शिक्षक होण्याची इच्छा बाळगणारे विद्यार्थीच कमी झाले. आज जे ४० ते ५५ वयाचे शिक्षक आहेत. त्यांची सामाजिक, मानसिक, भावनिक स्थिती अत्यंत क्लिष्ट होऊन बसली आहे. मानसन्मान हा तर राहिला बाजूला. समाजामध्ये शिक्षकांविषयी असा एक समज निर्माण झाला की 'येत नसेल मागता भीक तर मास्तरकी शिक'. यापेक्षा मोठे दुर्दैव काय असू शकते? आणि हाच आदर्श आजच्या विद्यार्थ्यांसमोर असतो.

मराठी शाळा व त्या शाळांमधील विद्यार्थी संख्या झपाट्याने कमी होत असताना, इंग्रजी शाळा व त्या शाळांमधील विद्यार्थी संख्या वाढत असताना, अशी ही काळाची पावलं ओळखत काय करता येऊ शकले असते यावर दृष्टिक्षेप टाकण्याची आवश्यकता होती. पण ती ओळखून त्यावर नियोजनबद्ध काम झाल्याचे दिसत नाही. आपण नेमके कुठे कमी पडत आहोत याचे आत्मपरीक्षण या कालखंडात झालेच नाही, परंतु याही काळात काही शाळांनी काळाची पावलं ओळखत बदल केले. सातत्याने सुट्टीच्या कालखंडात काम करत जून महिन्यात शाळा सुरू होण्यापूर्वीच त्यांचे वर्ग भरतील इतके प्रवेश मिळविण्यासाठी धडपड केली. विद्यार्थ्यांना, पालकांना व समाजाला नेमके काय हवं ते ओळखत आपल्या शाळा टिकवल्या तर काही शाळांनी विद्यार्थी संख्येत सातत्यपूर्ण वाढही करून दाखवली. त्यांनी नेमकं काय केलं याचा अभ्यास खऱ्या अर्थाने करायला हवा. शिक्षकांची नोकरी म्हणजे 'मुलांनी भरलेला तयार वर्ग आणि त्यात मी माझ्याकडे असलेल्या कौशल्याने शासकीय नियमानुसार काम करेन'. पण तसे तयार वर्ग आता मिळतच नाहीत. शाळेत गेल्यावर वर्ग रिकामा असतो. परिसरातून मुलांचा शोध घेऊन त्यांचे प्रवेश निश्चित करावे लागतात, त्यानंतर त्यांना टिकवून ठेवणे आणि त्याबद्दल येणाऱ्या जबाबदाऱ्या यावर काम होण्याची आवश्यकता आहे. शासकीय कामांचा प्रश्न तर पूर्वीपासूनच आहे. शिक्षक तेंव्हाही करत होते. हे मी सांगतो कारण मी सुद्धा याच काळात १९९८ ला माझी मराठी शाळा नॉनग्रँट असताना नोकरीला लागलो. पण शिक्षक, मुख्याध्यापक आणि संस्थाचालक या सर्वांची योग्य टीम होती. सर्वांनीच अथक परिश्रम घेत ग्रँट मिळवली. एक एक करत सर्व शिक्षक अनुदानावर आलेत. पण दरवर्षी विद्यार्थी मिळवणे व ते टिकवणे, विविध उपक्रम करणे, पालकांशी, समाजाशी, जनतेशी नाळ जोडण्याचा विविध मार्गाने प्रयत्न सतत चालू ठेवणे. या सर्वांचा परिणाम म्हणजे आज माझी शाळा 'उदय शिक्षण प्रसारक मंडळ संचालित ज्ञानमंदिर विद्या संकुलातील श्री. के. रा. कोतकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय डोंबिवली' सारख्या सुसंस्कृत शहरात आजही नर्सरी ते बारावी जवळजवळ अडीच ते तीन हजार विद्यार्थी, भव्य बिल्डिंग, मूलभूत सुखसोयींनी युक्त आहे. येथे गेल्या २५ वर्षांपासून दरवर्षी विद्यार्थी संख्येत सातत्यपूर्ण वाढ होत आहे. त्यासाठी शिक्षकांनी काही वेळेला पदरमोड केली तर संस्थेने सामाजिक मदत मिळवली. आज माझ्या शाळेचे विद्यार्थी आंतरशालेय, तालुका, जिल्हा व राज्य पातळीपर्यंत विविध स्पर्धांमध्ये चांगले यश प्राप्त करत आहेत. ते यश विविध माध्यमांपर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न असतो. थोडक्यात सांगायचे तर स्वतःची उत्तम गुणवत्ता असणे हा एक भाग पण प्रत्यक्षात त्या गुणवत्तेचा अभिमान न बाळगता ग्राउंड लेव्हल ला जाऊन मुलं जमा करण्यापासून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व कामे करणे व त्यातून संपूर्ण शाळा विकसित करणे हे एक महत्त्वाचे काम.




खरंतर गुरु वशिष्ठ, परशुराम, सांदिपनी, द्रोणाचार्यां पासून साने गुरुजी, वि. स. खांडेकर, पु ल देशपांडे पर्यंत प्रचंड मोठी आदरणीय व संस्कारक्षम शिक्षण देणारी आचार्य-गुरूंची परंपरा आज काही प्रमाणात का असेना लपके देत आहे. याचा अर्थ इंग्रजी शाळेमध्ये गुरु शिष्य परंपरा नाही असं नाही. पण इंग्रजी शाळा म्हणजे छापखाना आणि मराठी शाळा म्हणजे कारखाना हे विसरता कामा नये. मराठी माध्यमातून शिकून पुढे तयार झालेली मुलं आणि इंग्रजी माध्यमातून शिकून तयार झालेली मुलं यांच्यामध्ये बहुसंख्य प्रमाणात फरक जाणवतो तो संस्कारांचा, संस्कृती जपवणुकीचा आणि माणुसकीचाही. अर्थात हे १००% बरोबर आहे असे अजिबात नाही, काही अपवाद सगळ्या ठिकाणी असतातच. अगदी अलीकडच्या काळात श्री. दत्तात्रय वारे गुरुजींनी वाबळेवाडी व जालिंदर नगरच्या जिल्हा परिषद मराठी शाळेचा कायापालट करून दाखवला, नव्हे जालिंदर नगरच्या शाळेला जगात क्रमांक एक ची शाळा म्हणून नावलौकिक मिळवून दिला. लोकसहभागातून शाळेचा विकास होतो हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले. आदर्श शाळा कशी असावी? म्हणून अशा शाळांचा सतत शोध घेत राहणे, तो घेतांना या प्रतिकूल परिस्थितीत उत्तम कामगिरी करत असलेल्या, विद्यार्थी संख्या वाढवत नेणाऱ्या, वाबळेवाडी सारख्या आदर्श शाळांचा शोध घेऊन त्यांना भेटी देणे आपल्याला सहज शक्य आहे. आपल्याकडे काय कमी आहे व त्यांच्याकडे असलेले उत्तम आपल्या शाळेत कसे आणता येईल यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करणे आपल्याच हातात आहे. शासकीय पातळीवर शाळांमध्ये विविध प्रकारच्या निकोप स्पर्धा, सर्व विषयांच्या निकालासाठी निकोप स्पर्धा, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणवत्तेबद्दल निकोप स्पर्धा ठेवता येतील आणि हा प्रयोग प्रशासनाच्या विविध विभागातही करता येऊ शकेल. आपनही इतिहासातील उज्वल परंपरेचा आधार घेत वर्तमान काळातील आपल्या समोरचा हा आदर्श अंगीकारला पाहिजे. यातच आजच्या वर्तमान मराठी शाळांचे त्या निमित्ताने त्यातून मराठी भाषेचे व तिच्या अभिजातपणाचेही रक्षण करण्यात आपण आपला खारीचा वाटा उचलू. अभिजात दर्जा प्राप्त झालेली मराठी भाषा वाचवायची असेल तर मराठी शाळा पुन्हा भरल्या पाहिजेत, नाहीतर पुढच्या पिढ्या आपल्याला माफ करणार नाहीत. शाळेत होणाऱ्या विविध उपक्रमांसाठी प्रमुख पाहुणे म्हणून स्थानिक परिसरातील शैक्षणिक, सामाजिक गरज वाटल्यास राजकीय क्षेत्रातील मान्यवर, ग्रामसेवक, सरपंच, नगरसेवक, आदर्श शासकीय अधिकारी यासारख्या व्यक्तींना बोलावलं तर स्थानिक परिसरात शाळेबद्दल सकारात्मक संदेश जाईल. अध्यापनाची नवीन पद्धत स्वीकारणे त्यामध्ये विद्यार्थ्यांना आव्हान देणे, यशस्वी विद्यार्थ्यांसोबत सेल्फी काढणे हे सर्व समाज माध्यमांमध्ये व्हायरल करणे. त्यांना त्यांच्या मित्रांकडून शिकण्यास प्रोत्साहन देणे कारण विद्यार्थी शिक्षकांकडून जितके शिकतात त्याहून जास्त आपल्या मित्रांकडून आत्मसात करतात. विद्यार्थ्यांना आंतरशाखीय विषयांचा अभ्यास करण्यास सांगणे. प्रत्येक विषय हा कोणत्या ना कोणत्या प्रकारे दुसऱ्या विषयांशी जुळलेला असतो. त्यांना सुजनशीलतेचा स्वीकार व सर्जनशीलतेचा अंगीकार करण्यास सांगणे, यातून भविष्यामध्ये मातृभाषेतून शिक्षण घेण्याचे कृतीयुक्त महत्त्व सर्वमान्य होण्यास मदत होईल.

शालेय स्तरावर सर्व जण आपण मातृभाषेतून देण्यास यशस्वी झालो पाहिजे. या राष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत हिंदवी स्वराज्य उभे केले आपणही हाच आदर्श डोळ्यासमोर ठेवत आजच्या प्रतिकूल परिस्थितीत मराठी शाळांचा उत्तम रीतीने दर्जा वाढवला तर अभिजात मराठी ज्ञानभाषा, जनभाषा झाल्याशिवाय राहणार नाही.

माझा मराठीची बोलु कौतुके। परि अमृतातेहि पैजासी जिंके।' बाराव्या तेराव्या शतकातच ज्ञानेश्वर माऊलींनी इतक्या वैभवाच्या शिखरावर आरुढ झालेली माझी मराठी, इतिहासात सातत्याने दिसलेल्या, काही मराठी माणसांच्या दगाबाज प्रवृत्तीने जशी आपली राज्ये गेलीत, निष्ठावान माणसे गेलीत, तशीच याच माणसांमुळे मराठी भाषाही.... या लेखाच्या माध्यमातून आज खऱ्या अर्थाने मराठी भाषा वैभवशाली शिखरावर पोहोचण्यापासून कशी वंचित आहे? व त्यावर आपण काय उपाययोजना करू शकतो? यावर प्रकाश टाकता आला.

धन्यवाद.

**- प्रशांत पुंडलिक शिरुडे**

# कृत्रिम बुद्धिमत्तेला संवेदनशील बनवण्याबाबत चिंतन व्हावे- राज्यपाल जिष्णु देव वर्मा

**मुंबई । प्रतिनिधी**

आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंग विविध क्षेत्रात मोठी भूमिका बजावणार आहे. त्याचे लाभ जसे अनेक आहेत तसेच त्यातून अनेक समस्या देखील निर्माण होऊ शकतात. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेला अधिक संवेदनशील बनवण्याबाबत चिंतन झाले पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्तेची व्याप्ती वाढवून समाजाच्या शेवटच्या घटकातील लोकांना घेऊन समावेशी विकास झाला पाहिजे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

नाविन्यपूर्ण कौशल्याधारित शिक्षणाला चालना देण्यासाठी मुंबई येथील टलास स्किलटेक युनिव्हर्सिटीने सुरु केलेल्या 'सेंटर फॉर इनोव्हेशन'चे उदघाटन राज्यपालांच्या हस्ते संस्थेच्या बीकेसी येथील शैक्षणिक संकुलात झाले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी ओ. पी. जिंदल ग्लोबल युनिव्हर्सिटीने 'सिरील श्रॉफ सेन्टर ऑफ एआय, लॉ अँड रेग्युलेशन' यांच्या सहकार्याने आयोजित 'गव्हर्नींग एआय : कायदा, तंत्रज्ञान व समाज' या विषयावरील चर्चासत्राचे देखील उदघाटन राज्यपालांनी केले.

तंत्रज्ञान उपलब्ध असणे, परंतु तेथ उद्दिष्ट समोर नसणे; किंवा विज्ञान उपलब्ध असणे, परंतु त्याला मानवी मूल्यांची जोड नसणे धोक्याचे असते, असे सांगून कृत्रिम बुद्धिमत्तेचे नियमन करताना दया, अनुकंपा व सहानुभूतीचा त्यामध्ये अंतर्भाव असला पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले. या दृष्टीने शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये दुर्बल घटकांबद्दल अनुकंपा सहानुभूती बाणवली पाहिजे, असे आवाहन राज्यपालांनी केले.

पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी 'जय जवान' या घोषणेला 'जय किसान'ची घोषणेची जोड दिली होती. त्यानंतर पंतप्रधान वाजपेयी यांनी आपल्या काळात त्याला 'जय विज्ञान'ची जोड दिली व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्या घोषणेला 'जय अनुसंधान'ची जोड दिली असे सांगून सध्याचे युग हे विज्ञान व नवोन्मेषाचे असल्याचे राज्यपालांनी सांगितले. 'विकसित भारत' संज्ञेचा अर्थ आर्थिक दृष्ट्या संपन्न भारत इतका मर्यादित नाही असे सांगून 'विकसित भारत' म्हणजे 'सर्वे भवन्तु सुखिनः, सर्वे संतु निरामय' हा आहे व त्याकरिता प्रत्येक व्यक्तीचा विकास होणे आवश्यक आहे असे राज्यपालांनी सांगितले. नामशेष होत असलेल्या कलांचे जतन व्हावे आधुनिकीकरण तसेच मोठ्या प्रमाणावर यंत्रनिर्मित वस्तूंचा वापर वाढल्यामुळे आज जगभरातील हजारो पारंपरिक कला प्रकार आणि हस्तकला नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. एक कला जरी नामशेष झाली तरी आपण आपली सांस्कृतिक ओळख गमावतो. त्यामुळे नामशेष होत असलेल्या कलांचे जतन व संवर्धन झाले पाहिजे व त्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घेतला पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले.

एखादी दुर्मिळ कला वाचवणे म्हणजे तिला संग्रहालयात बंदिस्त करणे असे नसून तिला नवसंजीवनी देणे होय असे राज्यपालांनी सांगितले. या कार्यात टलास कौशल्य विद्यापीठाने देखील पुढाकार घ्यावा असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले.

राज्यपालांच्या हस्ते यावेळी ओ.पी. जिंदल ग्लोबल विद्यापीठातर्फे प्रकाशित एआय गव्हर्नन्स अहवालाचे प्रकाशन करण्यात आले. टलास स्किलटेक विद्यापीठाच्या संस्थापिका डॉ. इंदू शहानी यांनी प्रास्ताविक केले तर ओ.पी. जिंदल ग्लोबल विद्यापीठाचे कुलगुरु सी राज कुमार यांनी 'गव्हर्निंग एआय' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राची भूमिका विशद केली. सुरुवातीला राज्यपालांनी विद्यापीठाच्या नाविन्यता केंद्राला भेट दिली व विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांचेकडून नाविन्यपूर्ण उपक्रम व प्रयोगांची माहिती घेतली.

कार्यक्रमाला टलास स्किलटेक युनिव्हर्सिटीचे कार्यकारी अध्यक्ष सिद्धार्थ शहानी, कुलगुरु डॉ राजन वेळूकर, सिरील अमरचंद मंगलदास कंपनीचे व्यवस्थापकीय भागीदार सिरील श्रॉफ, अपग्रॅडचे अध्यक्ष रॉनी स्क्रूवाला, विद्यापीठाचे रजिस्ट्रार पराग अमीन, अध्यापक, निमंत्रित व विद्यार्थी उपस्थित होते.

## थोडक्यात

### अत्याधुनिक शववाहिकेचे आमदार बबनराव लोणीकरांचे हस्ते लोकार्पण

**परतूर । प्रतिनिधी**

माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून परतुर नगरपालिकेला सुमारे ३२ लाख रुपये किंमतीची अत्याधुनिक शववाहिका उपलब्ध झाली आहे. या शववाहिकेचे लोकार्पण आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी उपस्थित होते. हा कार्यक्रम परतुर येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरामध्ये पार पडला. या नवीन शववाहिकेमुळे परतुर शहर व परिसरातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत अधिक जलद व सुसज्ज सेवा उपलब्ध होणार आहे. आरोग्य व आपत्कालीन सेवांच्या दृष्टीने ही सुविधा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. परतुर नगरपालिकेला मिळालेल्या या सुविधेमुळे शहराच्या आरोग्य व्यवस्थेत अधिक सुधारणा होणार आहे.

### नगरपालिका 'आवो-जावो घर तुम्हारा'; अधिकाऱ्यांची मनमानी, शिस्तीचा बोजवारा; नागरिक हैराण

**परतूर । प्रतिनिधी**

शहरातील नगरपालिकेच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, उप-डाऊन करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या अनियमित उपस्थितीमुळे संपूर्ण प्रशासनच विस्कळीत झाल्याचे चित्र समोर आले आहे. वेळेचे कोणतेही बंधन न पाळता उशिरा येणे आणि कामकाज पूर्ण होण्याआधीच निघून जाणे, हीच अनेक अधिकाऱ्यांची दिनचर्या बनली आहे. त्यामुळेच पालिका 'आवो-जावो घर तुम्हारा' अशी उपहासात्मक ओळख निर्माण झाल्याची चर्चा शहरात रंगली आहे.

उप-डाऊन अधिकाऱ्यांच्या या मनमानीमुळे महत्त्वाच्या विभागांतील निर्णयप्रक्रिया ठप्प होत आहे. अनेकदा संबंधित अधिकारी वेळेवर उपलब्ध नसल्याने नागरिकांची कामे रखडत असून, दाखले, परवाने व करसंबंधित प्रक्रिया दिवसेंदिवस लांबत चालल्या आहेत. परिणामी, नागरिकांना वारंवार पालिकेच्या फेऱ्या माराव्या लागत असून, तासन्तास प्रतीक्षा करूनही काम न झाल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांचा या अधिकाऱ्यांवर प्रभावी वचक नसल्याची उघड चर्चा असून, नियंत्रणाच्या अभावामुळेच कर्मचारी वर्गातही शिस्त ढासळली आहे. वरिष्ठांकडून ठोस कारवाई होत नसल्याने उप-डाऊन अधिकाऱ्यांची मनमानी अधिकच वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

गेल्या अनेक वर्षांनंतर पालिकेत सत्तांतर झाल्यावर प्रशासनात शिस्त येईल, अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात परिस्थिती अधिकच गंभीर बनली असून, जबाबदारीची भावना कमी झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. या ढिसाळ कारभाराचा थेट फटका सामान्य नागरिकांना बसत असून, वेळ आणि पैशाचा अपव्यय होत आहे.

या पार्श्वभूमीवर उप-डाऊन अधिकाऱ्यांवर तातडीने नियंत्रण आणणे अत्यावश्यक बनले आहे. बायोमेट्रिक उपस्थिती, हजेरी रजिस्टरची सक्ती आणि अनियमिततेवर कडक कारवाई केल्याशिवाय प्रशासनात शिस्त येणार नाही, अशी ठाम भावना व्यक्त होत आहे. अन्यथा नागरिकांचा संताप अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

# रेवदंड्यात उष्णतेच्या झळांनी पर्यटन व्यवसायाला फटका

**रेवदंडा । प्रतिनिधी**

एप्रिलच्या मध्यापासून महाराष्ट्र किनारपट्टीवर पडलेल्या उष्णतेच्या लाटेने रेवदंडा (अलिबाग) सारख्या लोकप्रिय पर्यटनस्थळावर शांतता पसरली आहे. ४३ ते ४५ अंश सेल्सिअस तापमानाने पर्यटकांची वर्दळ जवळजवळ थांबली असून, स्थानिक रिसॉर्ट आणि हॉटेल व्यावसायिकांच्या खिशाला चाटपट बसली आहे. दुपारच्या वेळी समुद्रकिनारी फिरणे अशक्य झाल्याने पर्यटक हॉटेलच्या खोल्यांत कैद झाले आहेत, तर व्यावसायिक आर्थिक संकटात सापडले आहेत.

समुद्रकिनारा शांत, पर्यटक गायब एप्रिल २०२६ च्या मध्यापासून किनारपट्टीवर तापमानाची कमाल ४५ अंशांपर्यंत पोहोचली आहे. रेवदंड्याच्या सुंदर समुद्रकिनाऱ्यावर पूर्वी गर्दी असायची, आता मात्र दुपारच्या वेळी एकही पर्यटक दिसत नाही. सकाळी किंवा संध्याकाळीच फिरता येतं, दुपारचा कडक उन्हाळा सहन होतच नाही, असं मुंबईहून आलेल्या पर्यटक प्रिया जोशी यांनी सांगितलं. अलिबाग तालुक्यातील या पर्यटनस्थळावर दररोज शेकडो पर्यटक येत असत, आता ही संख्या ७० टक्क्यांनी घसरली आहे.रिसॉर्ट व्यावसायिक हैराण: उत्पन्नात ५० टक्के घसरण



उष्णतेमुळे पर्यटकांची संख्या कमी झाल्याने रेवदंड्यातील २० हून अधिक रिसॉर्ट्स आणि हॉटेल्सवर मोठा फटका बसला आहे. बुकिंग रद्द होतायत, खोल्या रिकाम्या पडल्या आहेत. उत्पन्न ५० टक्क्यांनी कमी झालंय, असं स्थानिक रिसॉर्ट मालक समीर आठवले यांनी सांगितलं. अनेक रिसॉर्ट्समध्ये एसी, पूल किंवा सावलीदार जागांची पुरेशी व्यवस्था नसल्याने पर्यटक दुसरीकडे वळले आहेत. उन्हाळ्यात पर्यटन हा आमचा मुख्य व्यवसाय, आता कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा चालेल? असा प्रश्न व्यावसायिक विचारत आहेत.

रिसॉर्ट्समध्ये उष्णतेपासून संरक्षणाची पुरेशी तयारी नसल्याचा आरोप होत आहे. सावलीदार कॉटेज, इंडोर गेम्स किंवा थंड पेयांचे स्टॉल नसल्याने पर्यटक नाराज होत आहेत. सुज्ञ नागरिकांमध्ये अशी चर्चा होत आहे की , व्यावसायिकांनी उन्हाळी हंगामासाठी पूर्वतयारी करायला हवी होती. आता स्थानिक अर्थव्यवस्थेला धक्का बसला आहे. यामुळे हॉटेल कर्मचारी, दुकानदार आणि गाडी व्यवसायालाही फटका बसला आहे.

रेवदंडासारख्या पर्यटनप्रधान गावात हा व्यवसाय थांबला असल्याने स्थानिक अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम होत आहे. व्यावसायिकांनी आता पावसाळ्यापर्यंत टिकण्यासाठी नवीन योजना आखण्याची गरज आहे. पर्यटकांसाठी थंडगार वातावरण निर्माण करणाऱ्या सुविधा वाढवाव्यात, असा सल्ला पर्यटन तज्ज्ञांनी दिला आहे. उष्णतेच्या लाटेनं दिलेला हा धक्का लवकर सावरावा, अशी प्रार्थना स्थानिकांकडून होत आहे.

# कृषी निविष्ठा विक्रेत्यांचा आजपासून बेमुदत बंद- अतुल लड्डा

## अन्यायकारक जाचक अटी आणि शासन धोरणाविरोधात विक्रेत्यांचा एल्गार

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टीसाईड्स व सीड्स डिलर्स असोसिएशन (माफदा), पुणे यांच्या राज्यव्यापी आवाहनाला पाठिंबा देत, जालना जिल्हा कृषी साहित्य उत्पादक आणि विक्रेता असोसिएशनने सोमवार, दि. २७ एप्रिलपासून जिल्ह्यातील सर्व कृषी सेवा केंद्रे बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती असोसिएशनचे अध्यक्ष अतुल लड्डा यांनी दिली. खरीप हंगामाच्या तोंडावर शासनाने लादलेल्या अन्यायकारक अटी आणि वाढत्या प्रशासकीय हस्तक्षेपामुळे हे पाऊल उचलावे लागत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

या संपामागची पार्श्वभूमी स्पष्ट करताना असोसिएशनचे अध्यक्ष अतुल लड्डा, सचिव गोपाल मानधनी आणि कोषाध्यक्ष बालाप्रसाद भक्कड यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात विविध प्रलंबित मागण्यांचा पाढाच वाचला आहे. यामध्ये प्रामुख्याने अनधिकृत एचटीबीटी बियाणे विक्रीच्या विरोधात कडक पावले उचलणे, खत कंपन्यांकडून विक्रेत्यांवर केली जाणारी मालाची सक्तीची लिंकिंग थांबवणे, तसेच अवैध कीटकनाशके व खते थेट शेतकऱ्यांना विकणाऱ्या अनधिकृत एजंटवर कारवाई करणे या मागण्यांचा समावेश आहे.



याशिवाय 'साथी' पच्या माध्यमातून बियाणे विक्री अनिवार्य करण्याच्या जाचक अटीला विक्रेत्यांनी तीव्र विरोध दर्शवला असून, किरकोळ खत विक्रेत्यांवर लादलेले अव्यवहार्य नियम आणि नवीन लागू होणारे बियाणे, खते व कीटकनाशक कायदे रद्द करण्याची मागणी केली आहे.

कीटकनाशक कंपन्यांकडून मुदत संपलेले (एक्सपायरी) मटेरियल परत न घेतले जाणे आणि प्रशासनाकडून 'इन्स्पेक्टर राज'मध्ये झालेली वाढ यामुळे प्रामाणिक विक्रेते आर्थिक व मानसिक दबावाखाली आले आहेत. विशेष म्हणजे, निविष्ठांचे सीलबंद पॅकिंग असतानाही दोष आढळल्यास विक्रेत्यांवर होणारी दंडात्मक कारवाई अत्यंत अन्यायकारक असून, अशा जाचक नियमांमुळे कृषी निविष्ठा व्यवसाय धोक्यात आला आहे.

जोपर्यंत या मागण्यांवर समाधानकारक तोडगा निघत नाही, तोपर्यंत जिल्ह्यातील एकही कृषी केंद्र उघडले जाणार नाही, असा इशारा असोसिएशनचे अध्यक्ष अतुल लड्डा, सचिव गोपाल मानधनी आणि कोषाध्यक्ष बालाप्रसाद भक्कड यांनी दिला आहे.

# मानवत ते रामेटाकळी रस्त्याची दैणीय अवस्था

## ग्रामीण भाग विकासा पासून कोसो दूर



**मानवत । प्रतिनिधी**

पाथरी विधान सभा मतदार संघातील मानवत तालूक्यातील ग्रामीण भागाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या व जिल्हा परिषद मतदार संघातील अनेक गावे आज ही विकासा पासून कोसो दूर राहिल्याने मतदार संघातील ग्रामीण भागाचा विकास खूंटला आहे. काही विकास कामे कागदावर तर अनेक कामे संथ गतीने सूरू आहेत. तर मार्च मार्च एंड मुळे अनेकांनी कामे थांबविली तर एप्रिल महिना ऊजाडला तरी विकास कामाकडे प्रशासनाचे दूर्लक्ष होत असल्यामूळे पाथरी विधान सभा मतदार संघातील विकास कामे खूंटली आहेत. त्यामूळे ग्रामिण भागाचा अर्थीक कणा मोडकळीस आला आहे.

लोककल्याणकारी प्रशासन याकडे लक्ष देईल का ? असा प्रश्न सामान्य जनतेला पडला आहे.

मतदार संघात विकासाची व रोजगारांची कामे सूरू करून विकासाकडे लक्ष द्यावे अशी मागणी ग्रामिण भागातून होत आहे.

# सहा महिन्यांच्या संसाराचा दुर्दैवी शेवट

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**



छत्रपती संभाजीनगर शहरातील रांजणगाव शेणपूंजी परिसरातून एक हृदयद्रावक आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. पती-पत्नीमधील कौटुंबिक वादाने इतके भीषण रूप धारण केले की, एका २२ वर्षीय तरुणाने आपले जीवन संपवल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. पवन ज्ञानेश्वर भुते असे मृत तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पवनचे लग्न अवघ्या सहा महिन्यांपूर्वी झाले होते. नवीन संसाराची स्वप्ने रंगवण्याच्या वयात पवन आणि त्याच्या पत्नीमध्ये मात्र घरगुती कारणांवरून सतत खटके उडत होते. या दररोजच्या वादांमुळे पवन गेल्या काही दिवसांपासून प्रचंड मानसिक तणावाखाली होता. अखेर या मानसिक त्रासाला कंटाळून त्याने राहत्या घरी गळफास घेऊन आपली जीवनप्रवास संपवला.

पवनने आत्महत्या केल्याचे सर्वात आधी त्याच्या शेजारी राहणाऱ्या भावाच्या लक्षात आले. खिडकीतून पाहिले असता पवन गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसला. भावाने कोणताही विलंब न लावता तात्काळ वाळूज एमआयडीसी पोलिसांना या घटनेची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच वाळूज एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घराचा दरवाजा आतून बंद असल्याने पोलिसांनी तो तोडून आत प्रवेश केला. यावेळी पवनचा मृतदेह छताला लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी घाटी रुग्णालयात पाठवला आहे. अवघ्या सहा महिन्यांच्या संसाराचा असा करुण अंत झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. किरकोळ वादातून टोकाचे पाऊल उचलल्याने एक हसतेखेळते कुटुंब उद्ध्वस्त झाले आहे. या प्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलीस पुढील तपास करत असून वादाचे नेमके कारण काय होते, याचा शोध घेत आहेत.

# मुंबई हादरली; डिलिव्हरी बॉयकडून अल्पवयीन मुलीशी अश्लील प्रकार, आरोपी अटकेत

**मुंबई । प्रतिनिधी**

सध्याच्या काळात ऑनलाईन शॉपिंग मोठ्या प्रमाणात वाढली आहे. लोक घरातील सामानासह कपडे आणि इतर वस्तू ऑनलाईन ऑर्डर करतात. काही दिवसांमध्ये किंवा अगदी काही तासांत ती वस्तू आपल्या घरी पोहोचते. यामुळे डिलिव्हरी बॉयचे काम करणाऱ्या लोकांना रोजगारही मिळाला आहे. मात्र आता एका डिलिव्हरी बॉयच्या कृत्याने मुंबई हादरली आहे. याप्रकरणी एकाला अटक करण्यात आली असून पोलिसांनी अधिक तपास सुरू केला आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मालाड पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका महिलेने ऑनलाइन साड़ीची ऑर्डर दिली होती. जेव्हा डिलिव्हरी बॉय साडी घेऊन महिलेच्या घरी पोहोचला, तेव्हा १२ वर्षांची पीडित मुलगी घरात एकटीच होती. त्यावेळी त्याने सांगितले की, त्याच्याकडे सुट्टे पैसे नाहीत, माझ्यासोबत कोणालातरी खाली पाठवा मी पैसे देतो. मग डिलिव्हरी बॉयसोबत ती मुलगी खाली गेली. त्यावेळी पेमेंट डिटेल्स दाखवण्याच्या बहाण्याने, त्याने तिला त्याच्या मोबाईल फोनवर अश्लील व्हिडिओ दाखवायला सुरुवात केली. यामुळे ती मुलगी ओरडायला लागली, त्यानंतर आरोपी फरार झाला.

या घटनेची माहिती मिळताच मालाड पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव मोहम्मद उपेश अनवर अंसारी आहे असून तो २४ वर्षांचा आहे आणि मालाड मालवणीचा रहिवासी आहे. पोलिसांच्या तपासादरम्यान मोबाईल आणि सीसीटीव्हीच्या माध्यमातून प्रकरण उघडकीस आले आहे. त्यानंतर पॉक्सो कायद्यांतर्गत एफआयआर नोंदवण्यात आला आहे. सध्या पोलिस आरोपीने इतरत्र कुठे असे कृत्य केले आहे की नाही, याचा तपास करत आहेत.

दरम्यान, याआधीही अनेकदा डिलिव्हरी बॉयने ग्राहकांसोबत गैरवर्तन केल्याचा प्रकार समोर आलेला आहे. काहीवेळा पार्सल खराब निघाल्याने ग्राहक आणि डिलिव्हरी बॉय यांच्यात वाद होतात. काही वेळा दोघांकडून एकमेकांना मारहाण देखील झाल्याचे समोर आले आहे. मात्र आता मुंबईत मात्र मोहम्मद उपेश अनवर अंसारी या डिलिव्हरी बॉयने हद्दच ओलांडली आहे. आता या डिलिव्हरी बॉयवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

# यवतमाळात गुप्तधनासाठी अघोरी पूजा; सहा जणांना मध्यरात्री अटक

**यवतमाळ । प्रतिनिधी**

जग आधुनिकतेकडे वाटचाल करत असताना महाराष्ट्रात मात्र अंधश्रद्धा वाढत असल्याचे समोर आले आहे.

यवतमाळच्या वडगाव जंगल पोलीस ठाण्याच्या हद्दीत कारेगाव शिवारात गुप्तधन शोधण्यासाठी अघोरी पूजा करत असलेल्या सहा जणांना वडगाव जंगल पोलिसांनी शनिवारी मध्यरात्री अटक केली. शिवारात मोटार पंप चोरीच्या गुन्ह्यात वाढ झाल्याने ठाणेदार विकास दांडे पथकासह आडवळणाच्या रस्त्याने गस्त घालत असताना वरूड-कारेगाव रस्त्यावर हा प्रकार उघडकीस आला. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

समोर आलेल्या माहितीनुसार, पोलिसांचे पथक वरूड ते कारेगाव मार्गावर संशयास्पद स्थितीत (एमएच ०१ बीएफ ६०२६) क्रमांकाचे वाहन उभे दिसले. पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये अघोरी पूजेशी संबंधित विविध साहित्य आढळून आले. यामध्ये कुदळ, अगरबत्ती, ज्वारीचे पीठ, काळ्या बाहुल्या, त्रिशूल, रुद्राक्ष माळ, लिंबू, केस, सुया, ताबीज, रंगीबेरंगी धागे आदी वस्तूंचा समावेश होता. या साहित्याच्या आधारे संशयित सहा जणांची चौकशी केली असता त्यांनी जमिनीतून गुप्तधन काढण्यासाठी शिवारात आलो असल्याची कबुली दिली.



यानंतर पोलिसांनी अशोक रामधन राठोड (५० रा. हरदा, ता.मानोरा, जि.वाशिम), रितेश रवी भगत (१९, रा. आमगव्हाण, ता. मानोरा, जि. वाशिम), लीलेश्वर विश्वनाथ बावणे (२६, रा. कारखेडा, ता. मानोरा, जि.वाशिम), कुंदन दारासिंग राठोड (२८, रा. वाई गौळ, ता.मानोरा, जि.वाशिम), वीरेंद्र रमेश गायकवाड (३५) केशव राठोड (५०, रा. बोरगाव, ता. आर्णी) यांना अटक केली. त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायदा २०१३ अंतर्गत कलम ३ (१) (२) (३) अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे या ठिकाणी काही महिलांचे फोटो आणि केस सुद्धा आढळले आहे. तसेच पंचधातूचे बिर कंगण ज्याचा उपयोग अघोरी पूजेसाठी केला जातो ते सुद्धा याठिकाणी आढळून आले. वीरेंद्र गायकवाड हा ही पूजा करणारा पुजारी असल्याचं समोर आलं आहे. आता पोलिसांनी अधिक तपास सुरू केला आहे.

# खाटू श्याम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात माजी नगराध्यक्ष मोहन अग्रवाल यांचा सपत्नीक गौरव



**परतूर । प्रतिनिधी**

येथील खाटू श्याम मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळ्या प्रसंगी मंदिराच्या उभारणीत मोलाचे योगदान देणारे शहराचे माजी नगराध्यक्ष मोहन अग्रवाल यांचा मंदिर समितीच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला.

खाटू श्याम मंदिराच्या निर्मितीसाठी माजी नगराध्यक्ष मोहन अग्रवाल यांनी विशेष पाठपुरावा केला होता. त्यांच्या अथक प्रयत्नातून मंदिराच्या संरक्षक भिंतीचे (कंपाउंड वॉल) काम आणि मंदिर परिसरातील पेवर ब्लॉक बसवण्यासाठी ३० लक्ष रुपयांचा विकास निधी उपलब्ध झाला.

प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित सत्कार समारंभात मोहन अग्रवाल व त्यांच्या सुविद्य पत्नीचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

## संक्षिप्त

### धुळे जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या ई-सुविधा पोर्टलचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे जिल्हा प्रशासनाने एआय आधारित तयार केलेल्या ई-सुविधा पोर्टलचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शिरपूर येथील कार्यक्रमात लोकार्पण करण्यात आले. यावेळी धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, महापौर मायादेवी परदेशी, आमदार अमरिशभाई पटेल, आमश्या पाडवी, राजेश पाडवी, काशीराम पावरा, मंजुळा गावित, राघवेंद्र भदाणे, अनुप अग्रवाल, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी धुळे जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या या पोर्टलबद्दल पालकमंत्री जयकुमार रावल, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांचे अभिनंदन केले. धुळे जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या एआय आधारित इंजिनमुळे प्रशासनाचा कारभार गतिमान होऊन पारदर्शकता वाढेल. यामुळे लोकांची कामे सुलभ होतील, असे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी या पोर्टलची माहिती देताना सांगितले की, मुख्यमंत्री महोदयांच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम, १०० टक्के ई-गव्हर्नन्स, टीसीएच तत्त्वे, तहसील ते मंत्रालय कार्यक्षमता या दृष्टीकोनातून प्रेरणा घेऊन पालकमंत्री महोदयांच्या मार्गदर्शनाने, जिल्हाधिकारी कार्यालय धुळे यांनी ई-सुविधा हे कृत्रिम बुद्धीमत्ता आधारित जिल्हा व्यवस्थापन पोर्टल विकसित केले आहे. अशा प्रकारचा उपक्रम राबविणारा धुळे हा देशातील पहिला जिल्हा आहे.

### शासन आणि 'युनिसेफ'मार्फत खेळ आणि संवादाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना लिंग समभावाचे धडे

**मुंबई । प्रतिनिधी**

लिंग भेद दूर करण्याबाबत राज्य शासनाच्या सहाय्याने अंगाई आणि युनिसेफतर्फे लिंग समभाव या विषयावर विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांना प्रबोधनपर प्रशिक्षण दिले जात आहे. युनिसेफ आणि अंगाई यांच्या सहकार्याने देशात पहिल्यांदा धाराशीव जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर राबविण्यात आलेल्या लिंग समभाव शिक्षण उपक्रमामुळे ग्रामीण मुलींच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडून येत आहे. खेळाधारित शिक्षण, संवाद आणि सहभागात्मक उपक्रमांच्या माध्यमातून किशोरवयीन मुला-मुलींमध्ये समानतेची जाणीव निर्माण होत आहे.

हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या शिक्षण आणि प्रशिक्षणाची जिल्हा संस्था डाएटच्या (डीआयईटी) सहकार्याने राबवण्यात आला. संपूर्ण भारतामध्ये केवळ धाराशिव जिल्ह्यात हा प्रकल्प राबवला असून त्यामध्ये १२० शाळा, ८००हून अधिक शिक्षक आणि १८,००० हून अधिक मुलांचा सहभाग होता.

महाराष्ट्रातील धाराशिवमध्ये, अंगाई-युनिसेफतर्फे लिंग समभाव हा विषय खेळाधारित शिक्षणाद्वारे किशोरवयीन मुले-मुली, शिक्षक आणि गावातील समुदायांना शिकवण्यात आला. मीना राजू मंच हा इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आला असून लिंग समभावाशी संबंधित विविध पैलूंची माहिती त्यांना करून देण्यात आली. त्यामध्ये संवाद, खेळ, चर्चा अशा विविध उपक्रमांचा समावेश होता. या कार्यक्रमाला स्थानिक संस्था स्वयं शिक्षण प्रयोग (एसएसपी), कोरो आणि मावा या स्वयंसेवी संस्थांचा सहभाग होता.

मी माझ्या आईशी आणि काकूशी याबद्दल बोलले. त्यांनाही हा भेदभाव जाणवला नव्हता. त्या जुन्या परंपरेनुसार मुलींना कमी अन्नाची गरज असते, असंच मानून चालल्या होत्या. पण मी त्यांना समजावून सांगितले की आम्हा दोघांनाही समान अन्नाची गरज आहे,

कारण आम्ही दोघेही समान कामं करतो, आर्णी गावातील इयत्ता आठवीत शिकणाऱ्या प्रज्ञा पाटोळे हिने स्वअनुभव कथन केला. शासन आणि युनिसेफ, अंगाई यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या उपक्रमामुळे मुलींना लिंग समभावाचे शिक्षण मिळाले. यामुळे विद्यार्थ्यांच्या आणि त्यांच्या सहायाने कुटुंबीयांच्या विचारसरणीत सकारात्मक फरक पडत आहे. या उपक्रमामुळे मुलींमध्ये आत्मविश्वास वाढल्याचे दिसून आले आहे.

# बनावट कागदपत्रांद्वारे जमीन हडपण्याचा प्रयत्न

## न्यायालयाच्या आदेशावरून तत्कालीन भूमी अभिलेख अधीक्षक व दुय्यम निबंधकासह ५ जणांवर गुन्हा दाखल



**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील मंठा रोडवरील डी-मार्टच्या बाजूला असलेल्या सर्व्हे क्र. ५५४ मधील ११ एकरपैकी ५ एकर (कल्याणी ग्रीन्स) शेतजमीन बनावट कागदपत्रांच्या आधारे हडपण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी जालना न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणात मयताचा १ महिला वारसदार संध्या राजेंद्र डागा, तिचा पती राजेंद्र सोभागमल डागा (दोघे रा. हिंगणघाट, जि. वर्धा), पॉवर ऑफ टर्नी अधिकार दिलेले आशिष अशोक छाजेड (रा. जालना) यांनी खोट्या कागदपत्राद्वारे रजिस्ट्री केली. जालन्याचे तत्कालीन भूमी अभिलेख उपअधीक्षक रवींद्र मुथा आणि जालनाचे सेवानिवृत्त दुय्यम निबंधक बद्रीनाथ बी. वाडेकर दोन बड्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने हा फसवणुकीचा कट रचल्याचा ठपका ठेवत, न्यायालयाने या ५ जणांविरुद्ध फौजदारी गुन्हा नोंदवण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशानुसार कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फसवणुकीच्या प्रकरणात दोन अधिकार्यांचा सहभाग आढळल्याने जिल्हा प्रशासनात प्रचंड खळबळ उडाली आहे.

या प्रकरणाची अधिक माहिती अशी की, अंकित अभयकुमारजी आबड (वय ३३, रा. नळगल्ली, जालना) हे कृषी आणि बांधकाम व्यावसायिक आहेत. त्यांचे आजोबा दिवंगत कचरुलाल आबड हे हिंदू अविभक्त कुटुंबाचे कर्ता होते. जालना येथील सर्व्हे क्र. ५५४ मधील ५ एकर जमिनीवरून आबड कुटुंब आणि आणि त्यांची बहीण संध्या डागा यांच्यात १९८६ पासून दिवाणी न्यायालयात वाद सुरू आहे. दिवाणी अपील क्र. १११/२०२० हे तांत्रिक कारणास्तव एप्रिल २०२२ मध्ये फेटाळले गेल्यानंतर, आरोपींनी या संधीचा गैरफायदा घेतला. संध्या डागा यांनी या जमिनीवर ताबा नसतानाही २० ऑगस्ट २०२१ रोजी आशिष छाजेड यांच्या नावाने एक बनावट जनरल पॉवर ऑफ अटर्नी (मुखत्यारपत्र) तयार केले.

या कटात तत्कालीन भूमी अभिलेख उपअधीक्षक रवींद्र मुथा आणि दुय्यम निबंधक बद्रीनाथ बी. वाडेकर यांनी आपल्या पदाचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. मुथा यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे ६ मे २०२२ रोजी कोणतीही नोटीस न देता आबड कुटुंबाचे नाव काढून संध्या डागा यांचे नाव प्रॉपर्टी कार्डवर चढवले. नाव नोंदणी होताच, त्याच दिवशी दुय्यम निबंधक वाडेकर यांनी कायदेशीर प्रक्रियेकडे दुर्लक्ष करून या जमिनीचे चार वेगवेगळे विक्री करारनामे (नोंदणी क्रमांक २३१० ते २३१३) करून दिले. अंकित आबड यांनी या प्रकरणी नोव्हेंबर २०२२ मध्ये पोलिसांकडे धाव घेतली होती. मात्र, पोलिसांनी गुन्हा दाखल न केल्याने त्यांनी न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने पोलीस अहवाल आणि कागदपत्रांची पडताळणी केली असता प्रॉपर्टी कार्डशी संबंधित मूळ सरकारी फाईलच रेकॉर्ड रूममधून गायब आहे, ज्यामुळे नोंदींमध्ये फेरफार झाल्याचा संशय बळावला व विक्री करारनाम्यासोबत जोडलेले ले-आउट नकाशे आणि नगररचना विभागाकडील अधिकृत नकाशे यात मोठी तफावत आढळली.

वाडेकर यांनी रद्द झालेले पीआर कार्ड जोडलेले आढळून आले. न्यायाधीश आर. एम. देवर्षी यांनी नमूद केले की, हा केवळ दिवाणी वाद नसून बनावट कागदपत्रे तयार करून सरकारी नोंदींमध्ये फेरफार करण्याचा फौजदारी गुन्हा आहे. यामध्ये सार्वजनिक सेवकांचा सहभाग असल्याने सखोल पोलीस तपासाची गरज व्यक्त करत न्यायालयाने कलम १५६(३) नुसार कारवाईचे आदेश दिले.

दरम्यान, संबंधित पोलीस अधिकाऱ्याचे म्हणणे मागवण्यात आले होते. त्यानुसार या प्रकरणाची सूक्ष्म चौकशी कदीम जालना ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक आरती जाधव यांनी करून सविस्तर अहवाल दिला. त्यावरूनच हे फसवणूक प्रकरण समोर आले. या प्रकरणात फिर्यादीच्या बाजूने ड. दर्शित आबड यांनी काम पाहिले. त्यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठातील ड. आशिष जाधवर, जालना येथील ड. पी. डब्ल्यू. कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले.

न्यायालयाच्या आदेशानुसार दि. २४ एप्रिल २०२६ रोजी कदीम जालना पोलिसांनी संध्या राजेंद्र डागा, राजेंद्र सोभागमल डागा, आशिष अशोक छाजेड यांच्यासह जालन्याचे तत्कालीन भूमी अभिलेख उपअधीक्षक रवींद्र मुथा आणि जालनाचे सेवानिवृत्त दुय्यम निबंधक बद्रीनाथ बी. वाडेकर या ५ जणांविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ४२०, ४६७, ४६८, १२०-बी आणि ३४ अन्वये गुन्हा नोंदवला असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक जनार्दन शेवाळे हे करत आहेत. महसूल आणि नोंदणी विभागातील अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल झाल्याने जिल्हा प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे.

# चौथी व सातव्या वर्गाची शिष्यवृत्ती परीक्षा

**जालना । प्रतिनिधी**



जालना जिल्ह्यात रविवार दि. २६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३.३० दरम्यान इयत्ता चौथी व सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षा सुरळीत पार पडल्या. जिल्हा प्रशासनाने यासाठी व्यापक तयारी केली होती. मात्र, परीक्षेनंतर उशिरापर्यंत शिक्षण विभागाकडून एकूण किती विद्यार्थी परीक्षेला बसले, त्यामध्ये मुली व मुलांची संख्या किती, गैरहजर विद्यार्थी कीती याबाबतची अधिकृत आकडेवारी जाहीर करण्यात आलेली नाही.

विशेष म्हणजे परिक्षेच्या आयोजनाची किंवा परिक्षेच्या वेळापत्रकाची माहिती संबंधीत विभागाने प्रसार माध्यमांना देणे आवश्यक होते. परंतु, तसे झाले नाही. पालकांनी जागृतपणे आपल्या पाल्यांना परिक्षेला बसविले. जालना जिल्ह्यात विविध केंद्रांवर परीक्षा आयोजित करण्यात आलेल्या परिक्षा केंद्रावर मुलांना घेऊन येणाऱ्या पालकांसाठी कोणतीही सुविधा दिसून आली नाही. पालकांना दिवसभर अति तिव्र उन्हात बसून विद्यार्थ्यांच्या भविष्याला गवसनी घालावी लागली. दरम्यान परीक्षा शांततेत पार पडल्याचे प्राथमिक माहितीवरून समजते.

मात्र, काही केंद्रांवर परीक्षेदरम्यान आवश्यक सुविधांचा अभाव दिसून आला.

# नांदेड विभागात विशेष तिकीट तपासणी मोहीम; ७४६ प्रकरणे उघड, ४.६५ लाखांचा महसूल

**नांदेड । प्रतिनिधी**

साऊथ सेंट्रल रेल्वेच्या नांदेड विभागात २३ एप्रिल २०२६ रोजी रेल्वे प्रवास नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी विशेष तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली. सकाळी ०५:०० ते रात्री २०:०० वाजेपर्यंत चाललेल्या या मोहिमेत विनातिकीट व अनियमित प्रवासाला आळा घालण्यावर विशेष भर देण्यात आला.

ही मोहीम विभागीय वाणिज्य व्यवस्थापक बी. रितेश (खठढड) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. एकूण २९ तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी ३१ गाड्यांची सखोल तपासणी केली.

तपासणीदरम्यान विनातिकीट प्रवास, अनियमित प्रवास तसेच बुक न केलेल्या सामानाच्या एकूण ७४६ प्रकरणांचा शोध लागला. या कारवाईतून रेल्वेला एकूण ४,६५,६९५ इतका महसूल प्राप्त झाला.




प्रकरणांचा तपशील असा आहे: विनातिकीट प्रवासाची ६१६ प्रकरणे आढळून आली असून त्यातून भाडे २,६२,६६५ व दंड १,५६,३५० वसूल करण्यात आला. अनियमित प्रवासाच्या ५६ प्रकरणांतून भाडे २०,६३० व दंड १५,००० मिळाला. तसेच बुक न केलेल्या सामानाच्या ७४ प्रकरणांतून ११,०५० वसूल करण्यात आले.

नांदेड विभागाने प्रवाशांना वैध तिकीट घेऊनच प्रवास करण्याचे आणि रेल्वे नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. अशा प्रकारच्या तपासणी मोहिमा पुढेही सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# उन्हाळ्याच्या दिवसात घर उघडे ठेवून झोपणाऱ्यांनो सावधान

## संभाजीनगर भागात गच्चीवरून प्रवेश करून ६५ हजारांचा ऐवज लंपास

**जालना । प्रतिनिधी**

सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने होणारी गर्मी कमी करण्यासाठी काही कुटुंब हे दरवाजा किंवा गच्ची उघडी ठेवून झोपतात, परंतु, त्याचाच गैरफायदा चोरटे घेत असल्याच्या घटना समोर येत आहेत.

त्यामुळे घर किंवा गच्ची उघडी ठेवतांना काळजी घ्यावी लागणार आहे. जालना शहरातील जयशंकर नगर भागात गच्चीचा दरवाजा उघडा असल्याने चोरट्याने सुमारे ६५ हजाराचा मुद्देमाल लंपास केलाय.

या प्रकरणी सदर बाजार पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



श्लोक जगदीश अग्रवाल हे त्यांच्या कुटुंबासह जयशंकर नगर, गोपीनाथ मुंडे चौक येथे राहतात.


ते रात्री जेवण करून कुटुंबासह घरात झोपले असताना पहाटे सुमारे १ वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी गच्चीवरील दरवाजा उघडून घरात प्रवेश केला.

यावेळी घरातील खोलीत झोपलेल्या त्यांच्या आई-वडिलांच्या खोलीतून चोरट्यांनी पर्समधील १० हजार रुपये रोख रक्कम आणि अंदाजे ५५ हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी असा एकूण ६५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. त्यानंतर चोरटे कंपाउंडवरून उडी मारून पसार झाले.

या घटनेनंतर दुसऱ्या दिवशी कौटुंबिक कारणास्तव बा हेरगावी गेल्यामुळे तक्रार देण्यास उशीर झाल्याचे तक्रारदाराने नमूद केले आहे.

# वीज खंडित झाल्याने आ. बबनराव लोणीकर यांचा संताप

**जालना । प्रतिनिधी**



जालना एमआयडीसीतील २२० केव्ही लाईनमधून मोतीबाग ३३ केव्ही फीडरकडे जाणारा वीजपुरवठा तारा तुटल्यामुळे खंडित झाल्याने जालना शहरातील अनेक भाग मागील २४ तासांपासून अंधारात आहेत. या प्रकारामुळे शहरातील दैनंदिन जीवन पूर्णतः विस्कळीत झाले असून नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर आमदार बबनराव लोणीकर यांनी वीज वितरण विभाग आणि कंत्राटदारांच्या निष्क्रियतेवर तीव्र संताप व्यक्त केला आहे.

शहरातील शनी मंदिर, माऊली नगर, यशवंत नगर, समर्थ नगर तसेच शासकीय कार्यालय परिसर आणि आसपासच्या भागांमध्ये वीजपुरवठा खंडित झाला आहे. त्यामुळे पाणीपुरवठाही ठप्प झाला असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. व्यापारी, रुग्णालये आणि लघुउद्योगांना याचा मोठा फटका बसला आहे.

या संदर्भात आमदार लोणीकर यांनी सांगितले की, जालना जिल्ह्यासाठी वीज वितरण विभागाकडून ३०० कोटी रुपयांहून अधिक निधी मंजूर असूनही कामांमध्ये ढिलाई होत आहे. मोतीबाग परिसरात नवीन १० एमव्हीए ट्रान्सफॉर्मर उभारणीसाठी टेंडर व वर्क ऑर्डर पूर्ण झालेली असताना कंत्राटदारांकडून काम रखडले आहे. कामाच्या गती आणि गुणवत्तेबाबत गंभीर त्रुटी असून नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

लोणीकर यांच्या संतापानंतर अधिकाऱ्यांनी आठवडाभरात मोतीबाग ३३ केव्ही उपकेंद्रात १० एमव्हीए ट्रान्सफॉर्मर बसवण्याचे काम सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच संबंधित कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

लोणीकर यांनी पुढे सांगितले की, केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांद्वारे वीज यंत्रणा मजबूत करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला जात आहे. प्रधानमंत्री सहज वीज हर घर योजना, दीनदयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजना, पुनर्रचित वीज वितरण क्षेत्र योजना, स्मार्ट मीटर राष्ट्रीय कार्यक्रम यांसारख्या योजनांमुळे वितरण व्यवस्थेत सुधारणा अपेक्षित आहे. तसेच प्रधानमंत्री कुसुम योजना, राष्ट्रीय सौर मिशन आणि प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजना यांद्वारे नागरिकांना स्वस्त व शाश्वत ऊर्जा उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे.

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना, कृषी पंप वीज जोडणी योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, घरगुती वीज जोडणी सुलभ योजना तसेच मुख्यमंत्री सौर रूफटॉप योजना, सौर पाणी तापक अनुदान योजना आणि लघुउद्योग वीज सवलत योजना यांमुळे नागरिक व उद्योगांना दिलासा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र या सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी स्थानिक पातळीवर होणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

वीज पायाभूत सुविधांच्या दृष्टीने ग्रीन एनर्जी कॉरिडॉर, राष्ट्रीय वीज प्रसारण योजना आणि राष्ट्रीय स्मार्ट ग्रीड मिशन यांसारख्या प्रकल्पांद्वारे जाळे मजबूत केले जात आहे. राज्यस्तरावरही विविध योजना राबवल्या जात असून उपकेंद्रे व लाईन विस्ताराचे काम सुरू आहे. तरीही अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी कामांना तातडीने गती देणे गरजेचे असल्याचे लोणीकर यांनी नमूद केले. दरम्यान, नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात अशा सुचना दिल्या.

# वडीलधाऱ्यांचा सन्मान हीच तीर्थयात्रा - महामंडलेश्वर

**सेलू । प्रतिनिधी**



संतांचे आशीर्वाद हे कल्पवृक्षासारखे फलदायी असतात. ज्या घरात वडीलधाऱ्यांचा सन्मान होतो, तिथेच खऱ्या अर्थाने देवपण वास करते. आजच्या काळात भौतिक सुखापेक्षा आई-वडिलांची सेवा आणि त्यांना दिलेला आनंद हीच सर्वात मोठी तीर्थयात्रा आहे, असे आशीर्वचनपर प्रतिपादन राष्ट्रसंत जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज यांचे कृपा पात्र शिष्य आणि पंचदशनाम जुना आखाड्याचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शिवगिरिजी महाराज (निफाड) यांनी केले.

सेलू (जि.परभणी) येथील श्री साईबाबा मंदिरात स्वाती व बाबासाहेब हेलसकर आणि परिवाराच्या वतीने गुरुवारी, २३ एप्रिल २०२६ रोजी आयोजित पार्वती व शंकरराव हेलसकर यांचा सहस्रचंद्रदर्शन आणि विजया व दत्तात्रय गोरे यांच्या अमृत महोत्सव यानिमित्त आयोजित सहस्रामृत सोहळ्यातील संगीतमय प्रवचनात ते बोलत होते.

या सोहळ्याद्वारे प्रथमच आईवडिल आणि सासू-सासरे या दोन्ही कुटुंबांतील जेष्ठांप्रति व्यक्त केलेल्या या आगळ्यावेगळ्या कृतज्ञतेचे महाराजांनी विशेष कौतुक केले. मीरा नारायण हेलसकर, छाया दिलीप हलगे, अश्विनी अजित गोरे, अर्चना अमोल झोटिंग, नातेवाईक आणि परिवाराने मान्यवरांचे स्वागत केले.

स्वामी शिवगिरिजी पुढे म्हणाले की, भारतीय संस्कृती ही अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारी आहे. त्यामुळे वाढदिवसाला मेणबत्त्या विझवून अंधार करण्यापेक्षा, जितकी वर्षे पूर्ण झाली आहेत तितके दिवे प्रज्वलित करून मांगल्याचा उत्सव साजरा करावा. यावेळी त्यांनी मार्कंडेय ऋषींचा दृष्टांत देत सांगितले की, संतांच्या 'आयुष्यमान भव' या एका आशीर्वादामुळे साक्षात मृत्यूवरही विजय मिळवता येतो. जो मनुष्य शुद्ध मनाने ईश्वराचे नामस्मरण करतो आणि पालकांची सेवा करतो, त्याचे रक्षण स्वतः भगवंत करतो.

घर म्हणजे केवळ भिंती नसून तिथे जपले जाणारे संस्कार आणि प्रेम महत्त्वाचे असते, हे या सोहळ्याने सिद्ध केले आहे. जीवनात कुणाचेही वाईट न चिंतता आनंदाने जगण्याचा संदेशही महाराजांनी यावेळी दिला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड, मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**